## प्रेसनोट

दि. ०५/०२/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून मौजे वरघड, ता. वेल्हा, जि. पुणे येथील महिला सरपंचाचे पती व गिवशी आंबेगाव, ता. वेल्हा, जि. पुणे या गावचे सरपंच यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ, १२ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४० वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) नथुराम कोंडीबा डोईफोडे, वय ३२ वर्ष, रा. स.नं. ७७/२/१, रायकर मळा, धायरी गांव, पुणे. (खाजगी इसम - मौजे वरघड, ता. वेल्हा, जि. पुणे येथील महिला सरपंचाचे पती)<br>२) बाळासाहेब धावू मरगळे, वय ३३ वर्ष, पद - सरपंच, गिवंशी आंबेगाव, तालुका वेल्हा, जि. पुणे. रा. स.नं. १६०, किरकटवाडी, हवेली, जि. पुणे (इ.लो.से.) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १८,००० (अठरा हजार) रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १६,००० (सोळा हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १६,००० (सोळा हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | ०५/०२/२०२५ |
| सापळा दिनांक | ०५/०२/२०२५ रोजी |
| ठिकाण | अतुल्य हॉटेलच्या पार्किंगमध्ये, नांदेड सिटी गेटच्या समोर, सिंहगड रोड, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रेम वाघमोरे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९९२३०४९५०२) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी नजीकच्या काळात आरोपी नं. १ नथुराम डोईफोडे यांची पत्नी सरपंच असलेल्या मौजे वरघड, ता. वेल्हा या गावात जमीन खरेदी केली असून त्या जमीनीमध्ये पुर्वीच्या मालकाच्या नावे असलेल्या घराच्या गाव नमुना ८ अ उतार्‍यावरील पुर्वीच्या मालकाचे नाव काढून टाकुन, तो उतारा तक्रारदाराचे नावे करुन देण्यासाठी मौजे वरघड ग्रामपंचायत कार्यालयात तक्रारदाराने अर्ज दिला होता. त्या अनुषंगाने तक्रारदार हे मौजे वरघड ग्रामपंचायतीचे महिला सरपंच श्रीमती सुवर्णा नथुराम डोईफोडे व त्यांचे पती आरोपी नं १ नथुराम डोईफोडे यांना भेटले असता, तक्रारदार यांचे नमुद काम करण्यासाठी व तसा ठराव ग्रामपंचायतीच्या मिटींगमध्ये घेण्यासाठी मौजे वरघड चे महिला सरपंच व त्यांचे पती आरोपी क्र. १ नथुराम डोईफोडे यांनी तक्रारदार यांच्याकडे १८,००० (अठरा हजार) रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या प्राप्त तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, महिला सरपंचाचे पती नथुराम डोईफोडे याने त्याची सरपंच पत्नी हिच्यासाठी तक्रारदाराकडे त्यांचे वरील काम करुन देण्यासाठी तडजोडीअंती १६,००० (सोळा हजार) रुपयाच्या लाचेची मागणी करुन, ती लाच रक्कम आज रोजी अतुल्य हॉटेलच्या पार्किंगमध्ये, नांदेड सिटी गेटजवळ, सिंहगड रोड, पुणे येथे तक्रारदाराकडून पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, आरोपी क्र. २ बाळासाहेब मरगळे, सरपंच, गिवशी आंबेगाव, ता. वेल्हा, जि. पुणे यांनी सदर लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने, त्या दोघांविरुद्ध सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner